International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# पीकरचनेवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास

**शुभम गणेश वाकडे[1], प्रा. डॉ. प्रतिभा स. काळमेघ[2]**
[1] *संशोधक विद्यार्थी*
[2] *मार्गदर्शक*

*Corresponding Author – शुभम गणेश वाकडे*
**DOI - 10.5281/zenodo.15251047**

**प्रस्तावना :**

भारत देश हा कृषी प्रधान देश असून रोजगार पुरविण्याऱ्या क्षेत्राच्या तुलनेत अग्रेसर आहे. शेती क्षेत्रामधूनच सर्व उद्योगांना कृषी क्षेत्र ही सर्व उद्योगांची जननी आहे. मानवी जीवनासाठी पोषक तसेच प्रगत समृद्धीचे प्रतीक समजली जाते. कोणत्याही राष्ट्राचा आर्थिक विकास साधायचा असल्यास त्यात प्रथम कृषी व कृषीवर आधारित उद्योगांचा विकास करावा लागतो. कारण शेती हीच सर्व उद्योगांचा पाया आहे. आज ही कृषी क्षेत्र हे जगातील सर्वाधिक लोकसंख्येचे उपजिवीकेचे साधन तसेच उत्पन्नाचे स्त्रोत आहे. जगातील सर्व विकसीत राष्ट्रांनी प्रथम कृषी क्षेत्राचा विकास करून औद्योगिक विकास केलेला आहे. त्यात पीक इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, रशिया तसेच जपान यांच्या विकासात कृषीचे मोठे योगदान आहे.

जगातील पहिला व्यवसाय शेती हाच असून प्रकृती आणि मनुष्य एकत्र आल्यानंतर तो निर्माण झाला. पंचमहाभूतांच्या लक्षावधी वर्षाच्या साठलेल्या उर्जा माणसाच्या श्रमाचा स्पर्श होताच गुणाकार करीत फळाला येतात. एका दाण्यातून शंभर दाणे तयार होण्याचा चमत्कार शेतीतच होतो. संपूर्ण जगाला अन्नधान्य पुरविण्याची क्षमता भारतभूमीत असूनसुद्धा भारतातीलच नागरिक अर्धवेळ उपाशी राहून झोपत असेल तर ते आपल्या देशाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. भारत हा कृषीप्रधान देश असून ५२.२ प्रतिशत लोकसंख्या प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या कृषी क्षेत्रावर उदरनिर्वाहासाठी अवलंबून आहे. या क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेता स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने शेती क्षेत्रातील गुंतवणुकीस प्रोत्साहन देवून त्यात वाढ केलेली आहे.

**पिकरचनेवर परिणाम करणारे घटक :**

**अ) नैसर्गिक घटक :**

विशिष्ट प्रदेशामध्ये कोणती पीक पद्धती अस्तित्वात येईल ही गोष्ट तेथील जमिनीचा दर्जा, हवामान, पर्जन्यमान यासारख्या नैसर्गिक घटकावर अवलंबून असते. जेथे काळी कसदार जमीन आहे. तेथे अनेक पिके घेता येतात. परंतु रेताड जमिनीत कोणत्या प्रकारची पिके घ्यायची याबाबत निवड करायला फारसा वाव नसतो. तसेच ज्या प्रदेशात कमी आणि अनिश्चित स्वरूपाचा पाऊस पडतो तेथे ज्वारी, बाजरी यासारखी पिके जास्त घेतली जातात. उलट पर्जन्यमान जास्त व निश्चित असल्यास धान, ऊस, तंबाखू अशी पिके घेता येतील. सिंचनाच्या सोयीमुळे घडून आलेला बदल पिकरचनेत महत्त्वाचा असतो. पर्जन्यमानानुसार पीक प्रकार ठरतो हे खरे आहे. परंतु कमी पावसाच्या प्रदेशातसुद्धा कृत्रिम पाणीपुरवठ्याच्या सोयी करून विविध पिके घेता येतात. उदा. ज्वारीच्या ऐवजी

कापसाची लागवड होऊ शकते. तसेच पाणीपुरवठ्यामुळे एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य होते. उत्पादनाने कार्यक्षेत्र तंत्र, रासायनिक खतांचा वापर या द्वारेसुद्धा भौतिक घटकांच्या मर्यादा बदलता येतात. अर्थात हा बदल घडवून आणणे काही प्रमाणात शक्य असते. शेवटी निसर्गाच्या रचनेत आमुलाग्र परिवर्तन करणे माणसाला शक्य होत नाही.

**ब) आर्थिक घटक :**

पीक पद्धती प्रभावित करण्यामध्ये आर्थिक घटकांची भूमिका महत्वपूर्ण असते. यामध्ये विविध वस्तूंच्या किंमती व त्यात होणारे बदल, उत्पन्नाचा विचार, शेताचा आकार, जोखीम इत्यादी घटक समाविष्ट आहेत.

(I) शेतमालाच्या आणि आदानांच्या किंमती हा घटक जास्त प्रभावशाली असतो. शेतमालाची किंमत अस्थीर असेल, जे पीक घेतले त्या पिकाला योग्य भाव नसेल तर ते उत्पादन न घेण्याची प्रवृत्ती राहील. भारतामध्ये कापसाची किंमत कमी राहिल्यामुळे कापसाची लागवड कमी झाल्याचे दिसून येत आहे. उत्पादित मालाबरोबरच शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या आदानांच्या किंमतीमधील बदलांचा प्रभाव पीक प्रकारावर पडतो. ज्या पिकाला योग्य हमीभाव आहे. ते पीक इतर पिकांच्या तुलनेत घेण्याची प्रवृत्ती जास्त राहील,

(II) धारण क्षेत्राचा आकार सुद्धा पिकरचनेला प्रभावित करतो. छोट्या धारण क्षेत्रामध्ये अन्नधान्याचे उत्पादन जास्त तर मोठ्या धारण क्षेत्रामध्ये व्यापारी पिकांचे उत्पादन जास्त घेण्याची प्रवृती असते. कारण सिमांत शेतकरी आधी स्वतःच्या उदरनिर्वाहाची सोय करतो, तथापी इतर सोई जर उपलब्ध असल्या (प्रामुख्याने पाणी पुरवठा) तर नगदी पिके घेण्याची प्रवृती सिमांत कास्तकारांमध्येही निर्माण झालेली दिसते, कारण मौद्रिक गरजासुद्धा विचारात घाव्या लागतात.

सिंचनाच्या सोयीसोबतच इतरही आदानांचा परिणाम पीक पद्धतीवर होतो. जसे खते, कीटक नाशके, सुधारित बी-बियाणे इत्यादी साधने वेळेवर आणि पुरेशा मात्रेन उपलब्ध हवीत, जर आदानांचा पुरवठा अनिश्चित असेल तर ते पीक फायदेशीर असूनही घेण्याची प्रवृत्ती कमी राहील.

IV) विशिष्ट प्रकारचे पीक घेण्यामध्ये जोखीम किती आहे याचाही विचार केला जातो. काही जाती कीड आणि रोगांनी लवकर प्रभावित होतात. काहीवेळा बाजारातील किंमतीचे परिवर्तन अनिश्चित असते. अशा तऱ्हेची जोखीम जर सातत्याने राहात असेल तर कमी फायदेशीर व कमी जोखिमीचे पीक घेण्याची प्रवृत्ती राहील. ज्वारी किंवा बाजरी जास्त फायदेशीर नसूनही अनेक जण त्याची लागवड करतात. याचे कारण आपल्या भागातील नैसर्गिक अनिश्चितेमध्येही ही पिके टिकून राहण्याची शक्यता जास्त असते.

**क) सामाजिक घटक :**

सामाजिक वातावरण, रुढी-परंपरा दृष्टिकोण इत्यादी समावेश या घटकात होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील शेतकऱ्यांचा दृष्टिकोन संकुचित व परंपरागत होता. तसेच संयुक्त कुटुंबामुळे अनेक व्यक्तींना उदरनिर्वाह सहजपणे एका ठिकाणी व्हायचा अशा वातावरणात बदल घडवून आणण्याची इच्छा लवकर निर्माण होत नाही. परंतु आधुनिक काळात भारतात जे बदल घडून आले त्यामुळे व्यापारी शेतीचा प्रसार झाला. अर्थात पीक पद्धतीत बदल होण्यास सुरुवात झाली, म्हणजे सामाजिक परिस्थिती ही सुद्धा या संदर्भात महत्वाची असते.

**इ) शासकीय धोरण :**

शेती क्षेत्रावरसुद्धा सरकारी धोरणांचा प्रभाव पडतो. पीक पद्धतीवर परिणाम करण्यासाठी सरकारची अनेक पावले कारणीभूत ठरू शकतात. शेतीच्या आदानांचा योग्य दराने पुरवठा करण्याचे ठरविल्यास त्याचा परिणाम होईल. तसेच सिंचन व्यवस्था, सुलभ प्रत्यय, रासायनिक खते, सुधारित बि-बियाणे इत्यादींचा पुरवठा, निर्यातीचे धोरण, शेतमालाचे हमी भाव, कर धोरण, अर्थ साहाय्य इत्यादी घटक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पीक पद्धतीवर परिणाम करणारे ठरतात.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१) मिश्राः पुरी (२०००), 'भारतीय अर्थव्यवस्था', हिमालया पब्लिशींग हाऊस, मुंबई.

२) रूद्र दत्तः के.पी.एम. सुंदरम (२००५), 'भारतीय अर्थव्यवस्था', एस. चांद कंपनी लि.

३) कविमंडन विजय, २००६, 'कृषी अर्थशास्त्र' श्री. मंगेश प्रकाशन, प्रथम आवृत्ती, नागपूर.